0 7 SEP 2026
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्य क्रीडा महोत्सव डिसेंबरमध्ये

## शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजन; २७ विद्यापीठांतील खेळाडूंचा सहभाग

■ संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा इतिहासात तब्बल २५ वर्षांनंतर पुन्हा एकदा डिसेंबरमध्ये महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव रंगणार आहे. या क्रीडाकुंभात राज्यातील २७ विद्यापीठांतील खेळाडू सहभागी होणार आहेत. या महोत्सवाची विद्यापीठाच्या क्रीडा विभागाने तयारी सुरू केली आहे.**

यंदाचा २८ वा क्रीडा महोत्सव शिवाजी विद्यापीठ आणि दापोलीतील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठात घेण्यास कुलपती तथा राज्यपाल कार्यालयाने मान्यता दिली आहे. या महोत्सवाचा कालावधी ११ ते १५ डिसेंबर राहणार आहे. महोत्सवातील ॲथलेटिक्स, बास्केटबॉल, बॅडमिंटन, खो-खो, कुस्ती या क्रीडा प्रकारांमध्ये दहा गटांत स्पर्धा शिवाजी विद्यापीठ, तर कृषी विद्यापीठात कबड्डी, व्हॉलीबॉल, बुद्धिबळ आणि टेबल-टेनिस या क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा होणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाला क्रीडा क्षेत्राची प्रदीर्घ परंपरा लाभली आहे. विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच विविध क्रीडा प्रकारांना प्रोत्साहन दिले असून, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कामगिरी करणारे खेळाडू विद्यापीठातून घडले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील विद्यापीठांमधील सर्वोत्तम खेळाडूंना एकाच व्यासपीठावर आणणारा क्रीडा महोत्सव विद्यापीठासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

डिसेंबर-जानेवारीमध्ये होणाऱ्या या राज्य क्रीडा महोत्सवात ॲथलेटिक्स, बास्केटबॉल, बॅडमिंटन, खो-खो आणि कुस्ती या पाच खेळांचा समावेश आहे. पुरुष आणि महिला अशा विविध गटांमध्ये स्पर्धा होणार असल्याने एकूण दहा गटांमध्ये खेळाडूंना आपले कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे. राज्यातील २७ विद्यापीठांमधून सहा हजार खेळाडू, प्रशिक्षक विद्यापीठात येणार आहेत.

### 'अश्वमेध'नंतर पुन्हा संधी

विद्यापीठात यापूर्वी २००१ मध्ये 'अश्वमेध' क्रीडा महोत्सव झाला होता.



त्यावेळी राज्यभरातील विद्यापीठांच्या खेळाडूंमुळे विद्यापीठ परिसरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर तब्बल २५ वर्षांनी राज्यस्तरीय क्रीडा महोत्सव होत असल्याने क्रीडा क्षेत्रातही उत्सुकता निर्माण झाली आहे. सध्या महोत्सवाचा कालावधी डिसेंबरचा असला, तरी विद्यापीठाने त्यांच्याकडील स्पर्धा तयारीच्या अनुषंगाने जानेवारीमध्ये घेण्यास मान्यता देण्याची विनंती कुलपती कार्यालयाला केली आहे.

### क्रीडा क्षमतेचे प्रदर्शन

राज्य क्रीडा महोत्सवाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा सुविधा आणि आयोजन क्षमता राज्यातील इतर विद्यापीठांसमोर मांडण्याची संधी मिळणार आहे. विविध विद्यापीठांतील खेळाडूंच्या सहभागामुळे स्थानिक खेळाडूंनाही उच्च दर्जाच्या स्पर्धेचा अनुभव मिळेल. या महोत्सवामुळे शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा क्षेत्राला पुन्हा एकदा राज्याच्या नकाशावर ठळक स्थान मिळणार आहे.

### क्रीडा विभागाची लगबग सुरू

**■ महोत्सवाच्या आयोजनाच्या दृष्टीने क्रीडा विभागाकडून विविध पातळ्यांवर नियोजन सुरू केले आहे. स्पर्धेसाठी आवश्यक क्रीडांगणे, साहित्य, खेळाडूंची निवास व भोजन व्यवस्था, वाहतूक, वैद्यकीय सुविधा, पंच व तांत्रिक अधिकाऱ्यांची नियुक्ती, सुरक्षा व्यवस्था यासह विविध बाबींचे नियोजन केले जात आहे. विविध विद्यापीठांमधून येणाऱ्या खेळाडू आणि अधिकाऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याची तयारी सुरू असल्याची माहिती क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी दिली.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 SEP 2026
पुढारी

# स्व-सुरक्षेसाठी महिलांनी आत्मनिर्भर होणे आवश्यक

## प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव; विद्यापीठात 'लाठी द गर्ल्स पॉवर' व 'देख ले इंडिया'ला प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मुली व महिलांनी आत्मरक्षणाची कौशल्ये आत्मसात करून स्वतःच्या सुरक्षेसाठी आत्मनिर्भर होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्र- कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियान व स्वयंशिद्धा सेंटरच्या वतीने 'लाठी द गर्ल्स पॉवर' आणि 'देख ले इंडिया' या चित्रपटांचे विशेष स्क्रीनिंग राजर्षी शाहू सभागृहात झाले. यावेळी त्या बोलत होत्या. मुली आणि महिलांच्या विचार व कार्याचा गौरव करणारा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

अभिजित सोनकांबळे निर्मित 'लाठी द गर्ल्स पॉवर' हा आत्मरक्षणाचा संदेश देणारा, तर शांती मोहन व मुकुंद मूर्ती निर्मित 'देख ले इंडिया' हा अंध मुलींच्या क्रिकेट खेळावर आधारित चित्रपट आहे. याप्रसंगी दोन्ही चित्रपटांच्या पोस्टर्सचे अनावरण प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते झाले. बेटी बचाओ बेटी पढाओ व स्वयंशिद्धा सेंटरच्या समन्वयक प्रा. डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास ज्येष्ठ नाट्य अभिनेते श्रीहरी देशपांडे, दीप्ती कांबळे, रोहन काटवरे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 SEP 2026

सकाळ

# युवा संसदेच्या समन्वयकपदी डॉ. माने



डॉ. प्रल्हाद माने

कोल्हापूर : अठराव्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेसाठी समूह समन्वयक आणि राष्ट्रीय परीक्षकपदी शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागातील प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांची संसदीय कार्य मंत्रालयाने निवड केली. स्पर्धेच्या मूल्यांकनासाठी देशभरातील सहभागी विद्यापीठे व महाविद्यालयांची १२ झोनमध्ये विभागणी केली असून, प्रत्येक झोनसाठी समूह समन्वयकांची नियुक्ती केली आहे. यात डॉ. माने यांच्यावर पाच राज्यांतील सात विद्यापीठे व महाविद्यालयांच्या मूल्यांकनाची जबाबदारी आहे. ते विद्यापीठाच्या नेतृत्व विकास केंद्राचे समन्वयक आणि वसतिगृहाचे मुख्य अधीक्षक आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 SEP 2026
तरूण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात वृक्षरोपण करताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे सोबत विद्यार्थी.

# शिवाजी विद्यापीठात एमबीए विभागातर्फे वृक्षारोपण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील एम.बी.ए. विभागामार्फत शिक्षक दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन कुलसचिव यांच्याकडून रोप लावून करण्यात आले.
यावेळी एम.बी.ए. विभागाच्या प्र. संचालिका डॉ. दीपा इंगवले तसेच विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. तेजश्री घोडके, डॉ. जयश्री लोखंडे, स्मिता कांबळे, अनिता पाटील आणि शेखर तुपे उपस्थित होते. यामध्ये १०० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. विद्यापीठातील रॉक गार्डन परिसरासमोर वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. विद्यार्थ्यांनी पिंपळ, चाफा,चिंच व आपट्याची प्रत्येकी एक अशी १०० देशी रोपांची लागवड करण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 SEP 2026
तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात कृत्रिम अवयव निर्मिती कार्यशाळा

**प्रतिनिधी,कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजिच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाच्यावतीने कृत्रिम अवयव निर्मिती संशोधनावर आधारित 'मॅट्रिक्स मेथड सीएनसी मशीन फॉर ऑटोमेटेड बॉडी पार्ट स्कॅनिंग अँड प्रोस्थेटिक फॅब्रिकेशन" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली.

या कार्यशाळेसाठी जवाहरलाल नेहरू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, भारती विद्यापीठ पुणे येथील डॉ. निरंजन देशमुख व टी.के. आय.टी., वारणानगर येथील प्रा. डॉ. अमोल तोडकर यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. देशमुख यांनी संशोधनातून विकसित केलेल्या मॅट्रिक्स मेथड आणि ३डी स्कॅनिंग प्रणालीवर आधारित सीएनसी मशीनचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखविले. या तंत्रज्ञानाच्या

**डॉ. देशमुख, प्रा. अमोल तोडकर यांचे मार्गदर्शन**

साहाय्याने शरीराच्या विविध पृष्ठभागांचे अचूक स्कॅनिंग व मोजमाप करून त्यानुसार कृत्रिम अवयव तयार करण्याची प्रक्रिया अधिक अचूक, सुलभ आणि प्रभावी कशी करता येते, याचे मार्गदर्शन त्यांनी केले.

कुलगुरू प्रा. डॉ. राजनिश कामत, प्र–कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यशाळेचे आयोजन डॉ. सागर पोर्लेकर, सहाय्यक प्राध्यापक, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी यांनी केले. प्रा. डॉ. अजित कोळेकर, प्र. संचालक, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी तसेच डॉ. प्रविण प्रभू, प्र. समन्वयक, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग यानी सहकार्य केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 SEP 2026
पुढारी

# तर्कसंगत विचारांना एआय पर्याय असू शकत नाही

## राजश्री मोरे; माध्यम संशोधन विषयावर विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (एआय) माध्यम संशोधनास मदत होत आहे. अनेक गुंतागुंतीच्या डेटावर प्रक्रिया करण्यासाठी



एआय संशोधकांना सहायभूत ठरत आहे. तथापि, ते मानवी मेंदू व तर्कसंगत विचारांसाठी पर्याय असू शकत नाही, असे मत संगणकशास्त्र अभ्यासक राजश्री मोरे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात आयोजित माध्यम संशोधन विषयावरील कार्यशाळेत त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव होते.

मोरे म्हणाल्या, एआयमुळे माहिती मिळवणे आणि त्यावर प्रक्रिया करणे सोपे झाले आहे; पण या माहितीवर सरसकट विश्वास ठेवणे घातक आहे. माहितीची खातरजमा करणे सर्वात मोठे आव्हान आहे. एआयचा वापर करत असताना नैतिकेला सर्वाधिक महत्त्व देणे आवश्यक आहे.

ग्रंथालय शास्त्रातील संशोधक अतुल नगरकर म्हणाले, संशोधक तटस्थ असणे आवश्यक आहे. संशोधन करताना शिस्त आणि संशोधन पद्धती कटाक्षाने अवलंबल्या पाहिजेत. अन्य संशोधकांनी केलेल्या संशोधनाचे संदर्भ देणे आवश्यक आहे. जयप्रकाश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी स्वागत केले. प्रीती भिसे व सायली गणेशकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. श्रावणी कालेकरने आभार मानले.

0 7 SEP 2026 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवराय अलौकिक क्षमतेचे योद्धे : भास्करन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आदिलशाही आणि मुघल साम्राज्याशी लढा देणारे छत्रपती शिवाजी महाराज हे युद्धाभ्यास आणि रणनीतीमध्ये अलौकिक क्षमता असलेले योद्धे होते, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रसिद्ध कादंबरीकार मेधा देशमुख भास्करन (बंगळुरू) यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्रातर्फे गणित अधिविभागातील रामानुजन सभागृहात 'आर्ट अँड लिटरेचर क्लब' अंतर्गत प्रसिद्ध इंग्रजी कादंबरीकार मेधा देशमुख भास्करन यांच्या मुलाखतीसह संशोधक विद्यार्थ्यांशी संवाद कार्यक्रमाचे आयोजन केले होते. लेखिका प्रमिला जरग आणि मित्रा देसाई यांची प्रमुख उपस्थिती होती. ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार लिखित 'चिकित्सा' या पुस्तकातून 'द लाइफ अँड डेथ ऑफ संभाजी' या पुस्तकांच्या लेखनाची प्रेरणा मिळाली, असेही त्यांनी नमूद केले.शाहू संशोधन केंद्राच्या संचालिका डॉ. मंजुश्री पवार आणि इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी मेधा देशमुख भास्करन यांची मुलाखत घेतली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 7 SEP 2026
सकाळ



शिवाजी विद्यापीठ : कल्चरल क्लब अंतर्गत संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग आणि 'स्वरमयी' यांच्यातर्फे 'राधा' कथा अभिवाचनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

# कल्चरल क्लबतर्फे विद्यापीठात अभिवाचन कार्यक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील कल्चरल क्लब अंतर्गत संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग आणि 'स्वरमयी' यांच्यातर्फे 'राधा' कथा अभिवाचनाच्या कार्यक्रमाला रसिक, प्राध्यापक, विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात हा कार्यक्रम झाला. 'कृष्णकिनारा' या अरुणा ढेरे यांच्या कथासंग्रहातील 'राधा' ही कथा नात्यांच्या गूढतेवर आणि स्त्रीच्या अंतरंग भावनांवर प्रकाश टाकणारी काळजाला भिडणारी कथा आहे. सविता कबनूरकर यांची निर्मिती व संकल्पना असलेल्या या अभिवाचनाचे दिग्दर्शन डॉ. शरद भुताडिया यांनी केले. अभिवाचक नाट्य अभिनेते राजन जोशी, संगीतकार उमेश नेरकर आणि गायिका कबनूरकर यांनी अभिवाचनातून कथेतील प्रत्येक प्रसंग आणि पात्रांच्या भावना जिवंत केल्या. उमेश नेरकर यांच्या पार्श्वसंगीताने आणि शुभम चौगुले यांच्या संगीत संचालनाने अभिवाचनातील भावउत्कटता अधिकच वाढवली. डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी स्वागत केले. मीरा गर्गे यांनी सूत्रसंचालन केले. ध्वनिव्यवस्था मल्हार जोशी, तर नेपथ्य विकास कांबळे यांनी पाहिले.

07 SEP 2026

जनसंपर्क कक्ष
तरुण भारत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात बाललैंगिक शोषण प्रतिबंधवर समुपदेशन कार्यशाळा

**कोल्हापूर :** बाल लैंगिक शोषण ही बालकांच्या सुरक्षिततेसमोरील गंभीर सामाजिक समस्या असून, तिच्या प्रतिबंधासाठी जनजागृतीबरोबरच संवेदनशील आणि प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन तज्ज्ञांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट येथे 'बाल लैंगिक शोषण प्रतिबंधासाठी जनजागृती आणि समुपदेशन प्रशिक्षण' या विषयावर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

स्कूलचे प्रभारी संचालक डॉ. संतोष सुतार आणि समाजकार्य अभ्यासक्रमाचे समन्वयक डॉ. उमेश गडेकर, समाजकार्य अभ्यासक्रमाचे सहायक प्राध्यापक डॉ. अमोल मिणचेकर, डॉ. उर्मिला दशवंत, मंजुषा मोहिते, डॉ. मुजावर, अधिविभागातील सर्व प्राध्यापक विद्यार्थी यांनी मार्गदर्शन केले. संस्थेच्या हिलिंग प्रशिक्षक मानसी नाईक तसेच प्रशिक्षक नेहा मारू, यांनी विविध सत्रांमधून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 SEP 2026
तरूण भारत



कोल्हापूर :विद्यापीठातील कार्यशाळेत सहभागी विद्यार्थी व मान्यवर.

# 'रोजगाराच्या संधी'वर विद्यापीठात कार्यशाळा

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या एम.बी.ए. विभाग व बीएनआय भूमी यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक क्षेत्रावर कार्यशाळा झाली. यामध्ये तज्ज्ञांनी व्यावसायिक क्षेत्राची माहिती दिली. प्रमुख पाहुणे म्हणून प्र–कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव उपस्थित होत्या.

यावेळी एम. बी. ए. विभागाच्या प्र. संचालिका डॉ. दीपा इंगवले, बीएनआय भूमी कोल्हापूर–सांगली जिल्ह्याचे विभागीय संचालक भाव्या सतरा, प्रीत सतरा व बीएनआय भूमीचे सदस्य, प्राध्यापक उपस्थित होते. बीएनआय भूमीच्या संचालकांनी विद्यार्थ्यांनी उद्योग कसा करावा तसेच त्यासाठी लागणारे आर्थिक सहाय्य आणि मार्केट नेटवर्क कसे निर्माण करावे यासंदर्भात मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांना उद्योग करण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी फायदेशीर ही कार्यशाळा उपयुक्त ठरली.

जनसंपर्क कक्ष
0 7 SEP 2026 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कमला कॉलेजमध्ये टेरेस गार्डनिंग कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर :** कमला कॉलेज येथील शिक्षक-पालक संघ आणि शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या संयुक्त विद्यमाने कमला कॉलेजमध्ये पालक मेळावा आणि टेरेस गार्डनिंग व्यवस्थापन कार्यशाळा उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्यात कौशल्य विकास व पर्यावरणपूरक जीवनशैलीविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कमला कॉलेजच्या प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार हे प्रमुख उपस्थित होते, तर इको फ्रेंडली टेरेस गार्डनिंग अँड सार्थ एज्युकेशन सोसायटीचे संचालक डॉ. दिलीप माळी हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले होते. कार्यक्रमाचे नियोजन कमला कॉलेज शिक्षक-पालक संघाचे समन्वयक व मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुजय पाटील यांनी केले. यावेळी डॉ. रामचंद्र पवार म्हणाले, विद्यार्थी केवळ पारंपरिक पदवी शिक्षणापुरते मर्यादित राहू नये, तर आपल्या आवडीनुसार कौशल्यधारित अभ्यासक्रमांचा विचार करणे गरजेचे आहे. डॉ. दिलीप माळी यांनी टेरेस गार्डनिंग यांनी शहरांमध्ये वाढत्या सिमेंटीकरणाच्या पार्श्वभूमीवर घरातील गच्चीवर किंवा मोकळ्या जागेत टेरेस गार्डनिंग कसे करावे, याबाबत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी पालकांच्या सहभागामुळे विद्यार्थी-पालक व महाविद्यालय यांच्यातील संवाद अधिक दृढ होण्यास मदत होत असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन स्वाती कांबळे यांनी केले, तर आभार डॉ. तानाजी घागरे यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 SEP 2026
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात ९ रोजी श्रावणधारा कार्यक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात कल्चरं क्लब अंतर्गत विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने बुधवार दि.९ रोजी दुपारी ३.०० ते ५.३० या कालावधीमध्ये राजर्षी शाहु सभागृहात 'श्रावणधारा" हिंदी–मराठी गाण्याचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तरी सदर कार्यक्रमास सर्व अधिविभागातील, विद्यार्थी, शिक्षक व प्रशासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 SEP 2026
सकाळ

# विद्यापीठात रोजगाराच्या संधींबाबत कार्यक्रम

कोल्हापूर : एम.बी.ए. विभाग आणि बीएनआय भूमीतर्फे शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक क्षेत्रांतील विविध मान्यवर व्यक्तींमार्फत व्यावसायिक क्षेत्राची माहिती देण्यासाठी 'अॅकॅडेमिया बिझीनेस इंटरॅक्शन' कार्यक्रम झाला. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव उपस्थित होत्या. प्रभारी संचालिका डॉ. दीपा इंगवले, बीएनआय भूमी कोल्हापूर-सांगली जिल्ह्याचे विभागीय संचालक भाव्या सतरा, प्रीत सतरा उपस्थित होते. डॉ. जाधव यांनी मनोगत व्यक्त केले.

0 7 SEP 2026

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'वि. स. खांडेकर मानवी जीवनाचे भाष्यकार'

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** वि. स. खांडेकर यांच्या साहित्यातून उपभोगवाद, पुरुषप्रधान मानसिकता, मानवी वासनेचा संघर्ष, प्रेम, त्याग, नैतिकता आणि हिंसेविषयीची भूमिका आजच्या समाजातील अनेक प्रश्नांशी थेट संवाद साधते. खांडेकर केवळ अलंकारिक भाषेचे साहित्यिक नव्हते, तर मानवी जीवनाचे भाष्यकार होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विचारवंत डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि आंतरभारती शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृतिवर्षाच्या सांगता समारंभात 'वि. स. खांडेकर : सुवर्ण स्मरण' या विषयावर विशेष स्मृती व्याख्यान देताना ते बोलत होते.

डॉ. मुणगेकर यांनी खांडेकरांच्या साहित्याचा गाभा मानवी जीवनाच्या सार्वकालिक प्रश्नांशी जोडलेला असल्याने नव्या पिढीने खांडेकरांना केवळ अभ्यासक्रमापुरते न पाहता त्यांच्या साहित्याचा नव्याने शोध घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी खांडेकरांचे साहित्य हे केवळ एका पिढीपुरते मर्यादित नसून आजच्या कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानाच्या युगातही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी शिवाजी विद्यापीठाने साकारलेले खांडेकरांचे स्मृती संग्रहालय म्हणजे त्यांच्याविषयी जपलेल्या आदरभावाचेच प्रतीक असल्याचे नमूद केले. अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी साहित्यिकांच्या प्रत्यक्ष विचारांतून, अनुभवांतून मिळणाऱ्या संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले. सुचेता कोरगावकर, खांडेकरांचे नातू डॉ. अतुल कापडी यांनीही खांडेकरांविषयीच्या आठवणींना उजाळा दिला. मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी परिचय, प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन, डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

0 7 SEP 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अथर्व चाळके, श्रावणी निमकर, आदित्य अंगज यांचे यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेज आयोजित विद्यापीठस्तर बुद्धिबळ स्पर्धेत अथर्व चाळके व श्रावणी निमकर (इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा) आणि आदित्य अंगज (भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेज, कोल्हापूर) यांनी अनुक्रमे पहिला, दुसरा व तिसरा क्रमांक पटकाविला. सर्वोत्कृष्ट महिला खेळाडू म्हणून अमीना बागवान (इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज), तर सर्वोत्कृष्ट पुरुष खेळाडू म्हणून शुभंकर कुलकर्णी (भारती विद्यापीठाचे यशवंतराव चव्हाण लॉ कॉलेज, कराड) यांना गौरविण्यात आले.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

**भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेज विद्यापीठस्तर बुद्धिबळ स्पर्धा**

उद्घाटन शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांच्या हस्ते आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र खैरनार यांच्या अध्यक्षतेखाली झाले. स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाशी संलग्न एकूण ८ विधी महाविद्यालयांनी सहभाग घेतला.

बक्षीस समारंभ फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे यांच्या हस्ते झाले. पंच म्हणून सोहम चाळके, व्यंकटेश शिंदे व यश मसाराम यांनी काम पाहिले. संयोजन डॉ. भक्ती भोसले, अभय चव्हाण, सिद्धेश गवळी व सहकाऱ्यांनी केले.




कोल्हापूर : भारतीय विद्यापीठ न्यू कॉलेज आयोजित बुद्धिबळ स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना गौरविताना मान्यवर.